# नवराष्ट्र

www.navarashtra.com


# बँकेच्या विविध योजनांचा फायदा घ्या

## अरविंद सिंह यांचे प्रतिपादन; स्टेट बँक शाखेचे वित्तीय समावेशन शिबिर




**समुद्रपूर, (ता. प्र.).** ग्राहकांना विविध कामासाठी बँकेत यावे लागत होते. आज परिस्थिती बदलली बँकेच्या विविध योजनांची माहिती घेऊन बँक आपल्या दारी संकल्पना सुरू झाली. तेव्हा भारतीय स्टेट बँकेच्या ज्या योजना आहेत, त्या योजनांचा लाभ नागरिकांनी घेणे काळाची गरज आहे, असे मत भारतीय स्टेट बँक शाखा समुद्रपूरचे उपव्यवस्थापकीय संचालक अरविंदकुमार सिंह यांनी व्यक्त केले.

समुद्रपूर स्टेट बँक शाखेच्यावतीने दीपाली कॉम्प्लेक्स येथे वित्तीय समावेशन शिबिर गुरुवारी ९दि. २८ ) आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्टेट बँकेचे उपव्यवस्थापकीय संचालक मुंबई अरविंदकुमार सिंग होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रशासकीय कार्यालय नागपूरचे उपव्यवस्थापक राजीव सौरव, विभागीय कार्यालय वर्धाचे विभागीय व्यवस्थापक सुधीर कुमार, आरबीआयचे विभागीय संचालक सचिन शेंडे, आरबीआय उपजनरल मॅनेजर अंजना सोमनाथ, आरबीआयचे एजीएम विनोदकुमार, जिल्हा अग्रणी बँकेचे चेतन शिरभाते, शाखा व्यवस्थापक विशाल धनविजय उपस्थित होते. यावेळी सोमनाथ यांनी १० वर्ष जुने खाते केवायसी करून सुव्यवस्थित चाली ठेवण्याबाबत आवाहनन केले.

यावेळी डेस्क ऑफिसर सदाशिव कालेवाड, अमृता गुहा, नितीन ढवळे, पदमाकर धकाते उपस्थित होते. कार्यक्रमात विविध योजनांची माहिती चेतन शिरभाते यांनी दिली. प्रास्ताविक राजीव सौरभ यांनी केले. संचालन अमृता गुहा व प्रीती चव्हाण यांनी केले. आभार सुधीर कुमार व शाखा व्यवस्थापक धनविजय यांनी मानले.

### शिबिरात कर्जाचे वाटप

शिबिरात कर्जाचे वाटपसुद्धा केले. तर पीएमजेडीवायअंतर्गत खाते उघडणे, त्याचप्रमाणे निष्क्रिय असलेले खाते सक्रिय करणे. त्याचप्रमाणे रूपे कार्ड वितरण करणे व सक्रिय करणे, पीएमजेजेबीवाय व पीएमएसबीवाय विमा नोंदणी करणे, अटल पेन्शन योजना नोंदणी करणे, किसान क्रेडिट कार्ड व स्वयं-सहाय्यता गट जोडणी करणे, डिजीटल बँकिंग, मोबाइल बँकिंग कशी करणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यशस्वीतेसाठी निशांत दुपारे, सुबोध गजभिये, प्रकाश मोघे, किरण गजभिये आदींनी परिश्रम घेतले.


'नवराष्ट्र' सोबत संपर्क करा'

- फोनः (0712) 2284001,02,03, संपादकीय 2284005, जाहिरात 2284007, प्रसार 2284006,
- E-Mail-n.nagpur @ gmail.com

**वर्धा** : पाशान चौक, विठ्ठल मंदिर रोड, मालगुजारीपुरा, वर्धा मो.नं. 9922441063, **हिंगणघाट** : 9422144577, **समुद्रपूर** : 9923383698, **सेलू** : 8080583527, **देवळी** : 9730182277, **आर्वी** : 9075012611, **आष्टी** : 9423420717, **कारंजा** : 9822742234.